# प्रेस नोट

**पोलीस स्टेशन अनसिंग यांची अवैध जनावरे वाहतुक विरूध्द धडक कारवाई**

पोलीस स्टेशन, अनसिंग
दि.04.03.2022

मा. पोलीस अधिक्षक सा. श्री बच्चन सिंग यांनी वाशिम जिल्हयाचा पदभार स्विकारल्यापासुन वाशिम जिल्हयातील अवैध जनावरांची वाहतुक विरूध्द धडक मोहिम हाती घेऊन वाशिम जिल्हयातील अवैध प्राण्याची वाहतुक करणा-या लोकांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

त्याचाच एक भाग म्हणुन मा पोलीस अधीक्षक साहेब श्री बच्चन सिंग यांचे मार्गदर्शनात परत एकदा वाशिम जिल्हातील अवैध जनावरांची वाहतुक करणा-या इसमाविरूध्द विशेष मोहिम सुरू केली आहे. सदर मोहिमे अंतर्गत दि.04.03.2022 रोजी पोलीस स्टेशन अनसिंग येथे मिळालेल्या गोपनिय माहितीव्दारे अनसिंग ते वारला रोडवर एक महिंद्रा बोलेरो पिकप गाडी क्र MH 37 T 0509 या वाहनातुन 09 गोवंश जनावरे (गाई व गोरे) व 01 वगार अवैधरित्या घेऊन जात असतांना मिळुन आला त्यास ताब्यात घेऊन त्याचेवर कलम 279 भादवी सहकलम 11 (1) (ड) प्राण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम सहकलम 23(अ)/177 मोवाका अन्वये गुन्हा दाखल करून वाहन व जनावरे असा एकुण 7,72, 000 /- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक सा. श्री बच्चन सिंग, अपर पोलीस अधीक्षक श्री गोरख भामरे, उपविभागीय पोलीस अधिकारी मंगरूळपीर श्री यशवंत केडगे यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन अनसिंगचे ठाणेदार श्री प्रशांत कावरे यांचे नेतृत्वात तसेच पोलीस उपनिरीक्षक आशिष देशमुख , पोहेकॉ शेषराव जाधव ब.नं.204, पोकॉ माणिक जुंगाडे , मधुकर देसाई व चापोकॉ बळीराम चिकाळकर ब.नं.1347 यांनी केली सदर कार्यवाहीमुळे अनसिंग शहरातील जनतेमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

04/03/22

**प्रशांत जे. कावरे**
**ठाणेदार, पोलीस स्टेशन**
**अनसिंग**

Scanned by CamScanner